0001

## नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांचे समोर

वाचावे :- १) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, यलोगेट पोलिस ठाणे, मुंबई यांचेकडून दि. २३/०९/२०११ रोजीच्या पत्रासोबत प्राप्त झालेले कागदपत्र.

२) या कार्यालयाची "कारणे दाखवा नोटीस" क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.६६/२०११/जा.८०१, दि. ०५/१०/२०११ व २५/१०/२०११.

३) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, यलोगेट पोलिस ठाणे, मुंबई यांचे दिनांक १८/१०/२०११ व दि.०१/११/२०११ रोजीचे लेखी अभिवेदन.

४) मन्सूर अहमद इद्रिस देवळेकर, हरिश जयस्वाल यांचे दि.१८/१०/२०११ रोजीचे लेखी निवेदन.

५) मुसा मुक्तार शेख, अमर सुरेंद्र पटनाईक, अब्बास मुदक तरपदार, राजू सोयलन विश्वास, राजू अमिद मंडल, अण्णाआपा सुब्रमण्यम स्वामी व सलीम मोहम्मद अली खान यांचे दि.१८/१०/२०११ रोजीचे एकत्रित लेखी निवेदन.

६) उस्मान अब्दुल लतीफ पिंजारा यांचे दि.०१/११/२०११ रोजीचे लेखी निवेदन.

क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.६६/२०११/जा. ९२०
नियंत्रक शिधावाटप व संचालक
नागरी पुरवठा यांचे कार्यालय,
रॉयल इन्शुरन्स इमारत, ५ वा मजला,
१४, ज.टाटा मार्ग, चर्चगेट,
मुंबई ४०० ०२०.
दिनांक : १६ /११/२०११.

### आ दे श

(जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ अन्वये)

### प्रकरणाची पार्श्वभूमी :-

यलोगेट पोलिस ठाणेचे पोलिस हवालदार श्री. संपतराव परशुराम शेजवळ (बक्कल क्रमांक २०३५०) हे दिनांक २०/०९/२०११ रोजी रात्रपाळी कर्तव्याकरिता गुन्हे प्रकटीकरण पथकात हजर झाले असता, त्यांना गुप्त बातमीदारामार्फत खबर मिळाली की, दिनांक २०/०९/२०११ च्या रात्री अल हुसैनी नावाच्या बोटीमधून तेलाची व केमिकलची अवैध व बेकायदेशिर वाहतूक होणार आहे. म्हणून पोलिस हवालदार श्री. संपतराव परशुराम शेजवळ त्यांच्या सहकार्यां समवेत पोलिस ठाण्यातून २०:३० वाजता भाऊचा धक्का येथे जाऊन एका खाजगी बोटीने समुद्रात गस्त घालण्याकरिता रवाना झाले. गस्त करीत असतांना माझगाव डॉकच्या समोर समुद्रात मिडल ग्राऊंड भागातून

एक संशयित बोट सीनॉल टेकडीच्या बाजूस जात असतांना दिसली. सदर बोटीजवळ त्यांनी खाजगी बोट नेऊन टॉर्चच्या इशाऱ्याने त्यांना बोट थांबविण्यास सांगितले. बोट थांबताच सदर बोटीवर चढून तिचे निरिक्षण केले असता, सदर बोटीचे नाव "अल हुसैनी " असल्याचे समजले. सदर वेळी बोटीचा तांडेल मन्सूर अहमद इद्रिस देवळेकर याचेकडे बोटीच्या कागदत्रांबाबत चौकशी केली असता, बोटीची कोणतीही कागदपत्र उपलब्ध नसल्याचे त्याने सांगितले. तद्नंतर बोटीची कसून तपासणी केली असता, बोटीवरील लाकडी फळ्याच्या डेकला असलेली चौकोनी फळ्यांची झाकणे उचकटून खाली पाहिले असता, त्यामध्ये एका प्लस्टिकच्या कॅनमध्ये अंदाजे ३५ लिटर डिझेल, ४००० लिटर पारदर्शक दिसणारे द्रव रसायन, २००० लिटर काळे तेल, होंडा कंपनीचे पाच मोटार पंप व एक प्लॅस्टिकचे काळे कॅन असा मुद्देमाल दिसून आला.

सदर बेकायदेशिर मालमत्तेबाबत अल हुसैनी बोटीचे तांडेल मन्सूर अहमद इद्रिस देवळेकर व बोटीवरील इतर खलाशी १) सलीम मोहम्मद अली खान २) राजू अमिद मंडल ३) अमर सुरेंद्र पटनाईक ४) अब्बास मुदक तरपदार ५) अण्णाआपा सुब्रमण्यम स्वामी ६) मुसा मुक्तार शेख व ७) राजू सोयलन विश्वास यांचेकडे चौकशी केली असता असे समजून आले की, बोटीत मिळून आलेले काळे तेल, पारदर्शक तेल व डिझेल याबाबत कसलेही कागदपत्रे नव्हती. तसेच अधिक चौकशी केली असता, सदर तांडेल यांनी सांगितले की, त्यास हरिश जैस्वाल नामे इसमाने सदर काळे तेल, केमिकल डिझेल आणण्यास सांगितले होते.

वर नमूद मुद्देमालाचा यातील अटक आरोपीतांनी अवैधपणे साठा केला असल्याने व ज्वलनशिल पदार्था विषयी आगळीक करुन त्यांची बेकायदेशिर वाहतूक करणार असल्याचे गुन्ह्याच्या प्राथमिक तपासामध्ये निष्पन्न झाल्याने सदर घटनेबाबत फिर्यादी यांनी यलोगेट पोलिस ठाणेचे, ठाणे अंमलदार, पोलिस उपनिरिक्षक, श्री. जाधव यांना भ्रमनध्वनीवरुन कळविलेवरुन ते त्यांच्या पथकासह व पंचासह बोटगेट या ठिकाणी आले. तीपर्यंत घटनास्थळी उपस्थित असलेले पथकाने सदर पकडलेली बोट व ८ इसम यांना मुद्देमालासह २४:०० वाजेपर्यंत बोटगेट या ठिकाणी घेऊन आले. पोलिस उपनिरिक्षक जाधव यांनी पोलिस हवालदार श्री. गणपतराव परशुराम शेजवळ यांचा सविस्तर जबाब नोंद करुन सदर बोट व त्यावर मिळून आलेला बेकायदेशिर साठ्याचा पंचनामा केला व त्यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन अल हुसैनी बोटीवर हजर असलेले ८ इसम यांना दि.२१/०९/२०११ रोजी अटक करण्यात आली आहे व त्यांना गुन्हा करण्यात भाग पाडलेला इसम हरिश जैस्वाल पाहिजे आरोपी यांचेविरुध्द गुन्हा नोंद करण्यात आला.

...ATIONING & C... HEAD O... MUMB...

अशाप्रकारे उपरोक्त सर्व संबंधितानी संगनमत करुन अवैध डिझेल साठा, पारदर्शक केमिकल सारखा दिसणारा द्रव पदार्थ व काळे तेल हे बेकायदेशिररित्या जवळ बाळगले, वाहतूक केल्याचे निष्पन्न झाल्याने, पर्यायाने त्यांनी शासनाची फसवणूक केल्याचे सिध्द होत असल्याने संबंधितांविरुध्द [१] जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ३, ७ [२] भा. द. वि. चे कलम २८५, ३४ चा भंग केल्यावरुन त्यांचेविरुध्द यलोगेट पोलिस ठाणे, मुंबई येथे गुन्हा नोंद क्र. ३९/२०११, दि.२१/०९/२०११ अन्वये गुन्हा नोंद करुन खालील मुद्देमाल जप्त करण्यात आला. तसेच जप्त साठयातून पंचासमक्ष नमुने घेण्यात आले.

| अ. क्र. | जप्त मुद्देमाल तपशिल | नग / साठा | जप्त मुद्देमालाची एकूण किंमत (रुपये) |
|---|---|---|---|
| १ | अंदाजे ३५ लिटर डिझेल | ३५ लिटर | १,४००/- |
| २ | अंदाजे ४००० लिटर पारदर्शक दिसणारे द्रव रसायन | ४००० लिटर | ६०,०००/- |
| ३ | अंदाजे २००० लिटर काळे तेल | २००० लिटर | १५,२५०/- |
| ४ | होंडा कंपनीचे पाच मोटार पंप | ५ नग | २०,०००/- |
| ५ | अल-हुसैनी नावाची बोट | १ नग | ५,००,०००/- |
| ६ | एक प्लॅस्टिकचे काळे कॅन | १ नग | २०/- |
| | | एकूण | ५,९६,६७०/- |

उपरोक्त जप्त मुद्देमालाची जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ प्रमाणे विल्हेवाट लावण्याची विनंती वरिष्ठ पोलिस निरिक्षक, यलोगेट पोलिस ठाणे, मुंबई यांनी केलेली असून, जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-ब नुसार सर्व संबंधितांना वरील वाचावे क्र. २ मध्ये नमूद केल्याप्रमाणे कारणे दाखवा नोटीस बजावून या प्रकरणी जप्त करण्यात आलेला मुद्देमाल सरकारजमा का करण्यात येऊ नये, याची कारणे स्पष्ट करणारा खुलासा मागविण्यात आला. तसेच मौखिक खुलासा करण्याची संधी म्हणून दि.१८/१०/२०११ रोजी या कार्यालयात सुनावणी ठेवण्यात आली.

दिनांक १८/१०/२०११ रोजीच्या सुनावणीस उपस्थित श्री. एस.बी. चिपकर, सहा. पोलिस निरिक्षक, यलोगेट पोलिस ठाणे यांनी वाचावे क्र. ३ अन्वये वरिष्ठ पोलिस निरिक्षक यांचे लेखी अभिवेदन सादर केले. तसेच सदर सुनावणीस मन्सूर अहमद इद्रिस देवळेकर, हरिश जयस्वाल हे उपस्थित राहून त्यांनी वाचावे क्र. ४ अन्वये त्यांचे स्वतंत्र लेखी निवेदन सादर केले व मुसा मुक्तार शेख, अमर सुरेंद्र पटनाईक, अब्बास मुदक तरपदार, राजू सोयलन विश्वास, राजू अमिद मंडल, अण्णाआपा सुब्रमण्यम स्वामी व सलीम मोहम्मद अली खान हे सदर सुनावणीस उपस्थित राहिले व त्यांनी वाचावे क्र. ५ अन्वये त्यांचे एकत्रित लेखी निवेदन सादर केले. सदर

सुनावणीस इतर आरोपी / अपचारी उपस्थित राहीले नाहीत. सबब, पुढील सुनावणी दिनांक ०१/११/२०११ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक ०१/११/२०११ रोजीच्या सुनावणीस उस्मान अब्दुल लतीफ पिंजारा उपस्थित राहिले व त्यांनी वाचावे क्र. ६ अन्वये त्यांचे लेखी निवेदन सादर केले. तसेच सदर सुनावणीस तपासी पोलिस अधिकारी तथा पोलिस निरिक्षक श्री. टोपे उपस्थित राहिले व त्यांनी वाचावे क्र. ३ अन्वये वरिष्ठ पोलिस निरिक्षक यांचे लेखी अभिवेदन सादर केले.

सबब, प्रकरण गुणवत्तेच्या आधारे निर्णयास्तव राखीव ठेवण्यात आले.

युक्तीवाद :-

दिनांक १८/१०/२०११ रोजीच्या सुनावणीस उपस्थित श्री. एस.बी. चिपकर, सहा. पोलिस निरिक्षक, यलागेट पोलिस ठाणे यांनी तसेच दिनांक ०१/११/२०११ रोजीच्या सुनावणीस उपस्थित तपासी पोलिस अधिकारी तथा पोलिस निरिक्षक श्री. टोपे यांनी वरिष्ठ पोलिस निरिक्षक यांचे सादर केलेल्या लेखी अभिवेदनात, सदर गुन्ह्याबाबत सखोल तपास चालू असून, सदर गुन्हा हा ऑईल माफिया व डिझेल माफिया यांचे स्मगलिंग कारवायांशी संबंधीत असल्याने सदर गुन्ह्यातील मुद्देमालाबाबत योग्य ती शहानिशा करण्याचे काम चालू आहे. जप्त बोट "अल - हुसैनी " तसेच बोटीतील जप्त काळे तेल, डिझेल व पारदर्शक ऑईल परत करण्यात येवू नये याबाबतची कारणे पुढीलप्रमाणे,

१) सदर गुन्ह्यातील "अल - हुसैनी " बोट ही मन्सूर अहमद इद्रिस देवळेकर याच्या मालकीची नाही.

२) प्राप्त माहितीनुसार सदर बोटीचा खरा मालक हा मुक्तार कासम नाखवा असून व त्याच्याच नावावर सदर बोटीचा परवाना आहे. सदरची बोट ही मन्सुर अहमद इद्रिस देवळेकर याने भाडे तत्त्वावर घेतली आहे.

३) सदर बोटीचा वापर हा मासेमारीसाठी असून सुध्दा यातील आरोपीतांनी बोटीच्या अंतर्गत रचनेत बदल करुन सदर बोट ही बरेच महिने किंवा वर्षे सदर बोटीचा वापर तेल वाहतुकीसाठी केला आहे. म्हणून त्यांची चौकशी करण्याचे काम चालू आहे.

४) सदर बोटीद्वारे यातील आरोपीतांनी मागील ५ / ६ महिन्यात किती वेळा अवैध वाहतूक केली व त्यातील तेल हे कोणाला विकले याबाबतची चौकशी बोटीच्या व आरोपीच्या साक्षीने करण्याचे काम चालू आहे.

तसेच सदर गुन्ह्यातील आरोपी तपासकामात योग्य ते सहकार्य करीत नसून सदर गुन्ह्याचा तपास प्राथमिक स्वरुपात असल्याने वरील कारणास्तव सदर बोट आरोपीतास परत करण्यास पोलिसांचा सक्त विरोध आहे. तरी सदर गुन्ह्यातील जप्त काळे तेल, डिझेल व पारदर्शक ऑईल जीवनावश्यक वस्तू कायदा १९५५ चे कलम ६-अ प्रमाणे शासकीय दराने शासकीय ठेकेदारांना रितसर निविदेद्वारे विक्री करण्याचे आदेश मिळण्यास विनंती आहे, असे नमूद केले आहे.

दिनांक १८/१०/२०११ रोजीच्या सुनावणीस उपस्थित मन्सूर अहमद इद्रिस देवळेकर यांनी युक्तिवाद केला की, अल हुसैनी बोटीचे मालक उस्मान अब्दुल लतीफ पिंजारा यांनी दिनांक १७/०८/२०११ रोजी सदरची बोट मुक्तार कासम नाकवा यांचेकडून खरेदी केली असून त्यांनी उस्मान अब्दुल लतीफ पिंजारा यांचेकडून दि.०१/०४/२०११ ते ३०/०९/२०११ या ६ महिन्याच्या कालावधीकरिता सदरची बोट भाडे तत्त्वावर घेतल्याची सांगून तसे करारपत्र निवेदनासोबत सादर केले. तसेच तो अल हुसैनी बोटीवरील तांडेल असून जमा केलेला मुद्देमाल हा स्लोप वॉटर घेतला होता. तरी सदर माल ताब्यात घेतल्यास त्याची काहीही हरकत नाही. त्याच्या बोटीवर खलाशांचा तसेच त्याच्या कुटुंबियांचा उदरनिर्वाह चालतो. तरी जप्त केलेल्या मालाची त्याला काहीही आवश्यकता नाही. सदर माल जमा करुन त्याला त्याची बोट परत करण्याची कृपा करावी, असे सांगून तसे लेखी निवेदन सादर केले.

दिनांक १८/१०/२०११ रोजीच्या सुनावणीस उपस्थित हरिश जयस्वाल यांनी युक्तिवाद केला की, अल हुसैनी बोटीमध्ये जो माल जप्त करण्यात आला. त्या मालाशी त्याचा काहीही संबंध नाही. तरीही त्याचे नाव यामध्ये चुकीने घेतलेले आहे. त्याला या चुकीच्या आरोपापासून मुक्त करावे अशी विनंती आहे, असे सांगून तसे लेखी निवेदन सादर केले.

दिनांक १८/१०/२०११ रोजीच्या सुनावणीस उपस्थित मुसा मुक्तार शेख, अमर सुरेंद्र पटनाईक, अब्बास मुदंक तरपदार, राजू सोयलन विश्वास, राजू अमिद मंडल, अण्णाआपा सुब्रमण्यम स्वामी व सलीम मोहम्मद अली खान यांनी युक्तिवाद केला की, त्यांनी जे काही पोलिस स्टेशनच्या पंचनाम्यात सांगितले आहे. त्यात काहीही बदलाव न करता ते सत्य आणि खरे आहे, असे सांगून तसे लेखी निवेदन सादर केले.

दिनांक २५/१०/२०११ रोजीच्या सुनावणीस उपस्थित उस्मान अब्दुल लतीफ पिंजारा यांनी युक्तिवाद केला की, तो अल हुसैनी बोटीचा मालक असून दिनांक ०१.०४.२०११ ते ३०.०९.२०११ अशा ६ महिन्याकरिता मन्सूर अहमद इद्रिस देवळेकर यांना मच्छिमाराच्या व्यवसायाकरिता भाडेतत्त्वावर बोट दिली होती. मुदत संपण्याच्या

अगोदर बोट परत मिळावी म्हणून त्याने नोटीस दिलेली आहे. त्याची तब्येत ठिक नसल्याने त्याने त्याची बोट भाडेतत्त्वावर दिलेली असून नोटीस प्राप्त झाल्यानंतर त्याला गुन्हा घडल्याची माहिती मिळाली आहे. त्याच्या कुटुंबाचे उदरनिर्वाहाचे एकमेव साधन अल हुसैनी बोट असून त्याचा या गुन्ह्याशी प्रत्यक्ष काहीही संबंध नसल्यामुळे दिलेल्या शर्तीनुसार त्याला त्याची बोट परत मिळावी अशी विनंती आहे, असे सांगून तसे लेखी निवेदन सादर केले.

निष्कर्ष :-

प्रस्तुत प्रकरणातील आरोपी / अपचारी यांचे निवेदन, तपासी पोलीस अधिकारी यांचे अभिवेदन व अभिलेखावरील उपलब्ध पुरावादर्शक कागदपत्रे विचारात घेऊन मी पुढील प्रमाणे निष्कर्ष काढीत आहे.

प्रस्तूत प्रकरणी, यलोगेट पोलिस ठाणे यांचे पथकास दिनांक २०/०९/२०११ च्या रात्री अल हुसैनी नावाच्या बोटीमधून तेलाची व केमिकलची अवैध व बेकायदेशिर वाहतूक होणार असल्याचे मिळालेल्या खात्रीलायक खबरीनुसार तेथील पथक भाऊचा धक्का येथे जाऊन एका खाजगी बोटीने समुद्रात गस्त करीत असतांना माझगाव डॉकच्या समोर समुद्रात मिडल ग्राऊंड भागातून एक संशयित बोट सीनॉल टेकडीच्या बाजूस अल हुसैनी नावाची बोट जात असतांना दिसली. बोटीची कसून तपासणी केली असता, बोटीवरील लाकडी फळ्याच्या डेकला असलेली चौकोनी फळ्यांची झाकणे पथकाने उचकटून खाली पाहिले असता, त्यामध्ये एका प्लस्टिकच्या कॅनमध्ये अंदाजे ३५ लिटर डिझेल, ४००० लिटर पारदर्शक ऑईल, २००० लिटर काळे तेल, होंडा कंपनीचे पाच मोटार पंप व एक प्लॅस्टिकचे काळे कॅन असा मुद्देमाल दिसून आला. सदर बेकायदेशिर मालमत्तेबाबत बोटीवरील उपस्थित इसमांकडे चौकशी केली असता असे समजून आले की, बोटीत मिळून आलेले काळे तेल, पारदर्शक तेल व डिझेल याबाबत कसलेही कागदपत्रे नव्हती. तसेच बोटीचे तांडेल यांनी सांगितले की, त्यास हरिश जैस्वाल नामे इसमाने सदर काळे तेल, केमिकल डिझेल आणण्यास सांगितले होते. यावरुन संबंधितांविरुध्द गुन्हा नोंदक करुन सदरची बोट, डिझेल, पारदर्शक ऑईल, काळे तेल, होंडा कंपनीचे पाच मोटार पंप इत्यादी एकूण रुपये ५,९६,६७०/- किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

HEAD OF ... MUMBAI

पोलिसांनी सुनावणीच्या वेळी सादर केलेल्या अभिवेदनात, सदर गुन्हा हा ऑईल माफिया व डिझेल माफिया यांचे स्मगलिंग कारवायांशी संबंधीत असल्याने सदर गुन्ह्यातील मुद्देमालाबाबत योग्य ती शहानिशा करण्याचे काम चालू आहे. जप्त बोट "अल - हुसैनी " ही मन्सूर अहमद इद्रिस देवळेकर याच्या मालकीची नसुन बोटीचा खरा मालक हा मुक्तार कासम नाखवा असून व त्याच्याच नावावर सदर बोटीचा परवाना आहे. सदरची

बोट ही मन्सुर अहमद इद्रिस देवळेकर याने भाडे तत्त्वावर घेतली आहे. सदर बोटीचा वापर हा मासेमारीसाठी असून सुध्दा यातील आरोपीतांनी बोटीच्या अंतर्गत रचनेत बदल करुन सदर बोट ही बरेच महिने किंवा वर्षे सदर बोटीचा वापर तेल वाहतुकीसाठी केला आहे. म्हणून त्यांची चौकशी करण्याचे काम चालू आहे. सदर बोटीद्वारे यातील आरोपीतांनी मागील ५/६ महिन्यात किती वेळा अवैध वाहतूक केली व त्यातील तेल हे कोणाला विकले याबाबतची चौकशी बोटीच्या व आरोपीच्या साक्षीने करण्याचे काम चालू असून सदर गुन्ह्यातील आरोपी तपासकामात योग्य ते सहकार्य करीत नसल्याने सदर गुन्ह्याचा तपास प्राथमिक स्वरुपात असल्याने वरील कारणास्तव सदर बोट आरोपीतास परत करण्यास पोलिसांचा सक्त विरोध आहे. तरी सदर गुन्ह्यातील जप्त काळे तेल, डिझेल व पारदर्शक ऑईल जीवनावश्यक वस्तू कायदा १९५५ चे कलम ६-अ प्रमाणे शासकीय दराने शासकीय ठेकेदारांना रितसर निविदेद्वारे विक्री करण्याचे आदेश मिळण्यास विनंती केलेली आहे.

अल हुसैनी बोटीचे तांडेल मन्सुर अहमद इद्रिस देवळेकर यांनी जप्त मुद्देमाल हा स्लोप वॉटर असून सदर माल ताब्यात घेतल्यास त्याची काहीही हरकत नसल्याचे सांगून बोटीवर खलाशांचा तसेच त्याच्या कुटुंबियांचा उदरनिर्वाह चालतो. तरी जप्त केलेल्या मालाची त्याला काहीही आवश्यकता नसल्याचे सांगितले आहे. हरिश जयस्वाल यांनी केलेल्या खुलाशात, अल हुसैनी बोटीमध्ये जप्त करण्यात आलेला मालाशी त्याचा काहीही संबंध नसुन त्याचे नाव यामध्ये चुकीने घेतल्याचे सांगून त्याला या चुकीच्या आरोपापासून मुक्त करण्यास विनंती केलेली आहे. तसेच मुसा मुक्तार शेख, अमर सुरेंद्र पटनाईक, अब्बास मुदक तरपदार, राजू सोयलन विश्वास, राजू अमिद मंडल, अण्णाआपा सुब्रमण्यम स्वामी व सलीम मोहम्मद अली खान या बोटीवरील खलाशांनी केलेल्या खुलाशात, त्यांनी जे काही पोलिस स्टेशनच्या पंचनाम्यात सांगितले आहे. त्यात काहीही बदलाव न करता ते सत्य आणि खरे आहे, अशी सांगितले.

यावरुन प्रस्तूत प्रकरणी जप्त करण्यात आलेली अल हुसैनी बोट व त्यामधील जप्त करण्यात आलेल्या एका प्लास्टिकच्या कॅनमध्ये अंदाजे ३५ लिटर डिझेल, ४००० लिटर पारदर्शक ऑईल, २००० लिटर काळे तेलचा साठा हा गैरमार्गाने व बेकायदेशीररित्या मिळविल्याचे सिध्द होते. यावरुन सदर डिझेल, पारदर्शक ऑईल व काळे तेल यांचा साठा अवैध असल्याचे सकृतदर्शनी स्पष्ट होत आहे. सबब, जप्त करण्यात आलेला संपुर्ण डिझेल, पारदर्शक ऑईल व काळे तेल यांचा संपूर्ण बेकायदेशिर साठा रासायनिक पृथ:करण अहवालाच्या अधिन राहून शासनजमा करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

मन्सूर अहमद इद्रिस देवळेकर यांनी केलेल्या खुलाशात, अल हुसैनी बोटीचे मालक उस्मान अब्दुल लतीफ पिंजारा यांनी दिनांक १७/०८/२०११ रोजी सदरची बोट मुक्तार कासम नाकवा यांचेकडून खरेदी केली असून त्यांनी उस्मान अब्दुल लतीफ पिंजारा यांचेकडून दि.०१/०४/२०११ ते ३०/०९/२०११ या ६ महिन्याच्या कालावधीकरिता सदरची बोट भाडे तत्त्वावर घेतल्याची सांगून तसे करारपत्र सादर केले आहे. तरी सदर बोटीवरील माल ताब्यात घेतल्यास त्याची काहीही हरकत नसल्याचे सांगून बोटीवर खलाशांचा तसेच त्याच्या कुटुंबियांचा उदरनिर्वाह चालतो. तरी जप्त केलेल्या मालाची त्याला काहीही आवश्यकता नसुन सदर माल जमा करुन बोट परत करण्यास विनंती केलेली आहे.

उस्मान अब्दुल लतीफ पिंजारा यांनी केलेल्या खुलाशात, तो अल हुसैनी बोटीचा मालक असून दिनांक ०१.०४.२०११ ते ३०.०९.२०११ अशा ६ महिन्याकरिता मन्सूर अहमद इद्रिस देवळेकर यांना मच्छिमाराच्या व्यवसायाकरिता भाडेतत्त्वावर बोट दिली होती. मुदत संपण्याच्या अगोदर बोट परत मिळावी म्हणून त्याने नोटीस दिलेली आहे. त्याची तब्येत ठिक नसल्याने त्याने त्याची बोट भाडेतत्त्वावर दिलेली असून नोटीस प्राप्त झाल्यानंतर त्याला गुन्हा घडल्याची माहिती मिळाली आहे. त्याच्या कुटुंबाचे उदरनिर्वाहाचे एकमेव साधन अल हुसैनी बोट असून त्याचा या गुन्ह्याशी प्रत्यक्ष काहीही संबंध नसल्यामुळे दिलेल्या शर्तीनुसार त्याला त्याची बोट परत मिळण्यास विनंती केलेली आहे.

वरिलप्रमाणे बेकायदेशीररित्या मिळविलेले डिझेल, पारदर्शक ऑईल व काळे तेल उक्त अल हुसैनी नावाच्या बोटीमध्ये बेकायदेशिररित्या खरेदी करुन विनापरवाना साठवणूक केले असल्याचे स्पष्ट झाले असून या गैरव्यवहाराकरीता उक्त अल हुसैनी बोटीचा वापर होत असल्याचे निष्पन्न झाले आहे. तथापि, सदर बोटीचे मालक उस्मान अब्दुल लतीफ पिंजारा हे असून सदरची बोट त्यांनी भाडेतत्त्वावर मन्सूर अहमद इद्रिस देवळेकर यास दिली होती. बोट मालकाने दिलेल्या निवेदनावरुन, जरी बोट मालकास सदर घटनेची माहीती नसली व सदरची बोट त्याने भाड्याने दिली असली तरी, आरोपी यांनी विनापरवाना व बेकायदेशीरत्या मिळविलेल्या जप्त डिझेल, पारदर्शक ऑईल व काळे तेलची वाहतूक व साठवणूक करण्याकरीता सदर बोटीचा गैरवापर केला असल्याचे सकृतदर्शनी दिसून येते. प्रकरणी, सदर बोट मालकाच्या अपरोक्ष जरी गुन्हा घडला असला तरी, बोट मालक या नात्याने त्यांनी त्यांच्या बोटीचा गैरवापर होणार नाही याची सर्वेतोपरी दक्षता घेणे आवश्यक आहे. सबब, जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ चे कलम ६ (अ) (क) मधील तरतुदीनुसार सदरची जप्त करण्यात आलेली अल हुसैनी बोट ही तीच्या बाजारमुल्याएवढी रक्कम भरण्यास बोटीचे मालक तयार असल्यास, तेवढी रक्कम भरल्यानंतर

HEAD OFF MUMBAI

सदरची बोट मालकास परत करण्याच्या अथवा बोट मालक सदरची रक्कम भरण्यास तयार नसल्यास या बोटीची जाहीर लिलावाने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणी जप्त मुद्देमालाची विल्हेवाट लावण्याचे आदेश देण्यापुरतेच सदरचे प्रकरण या कार्यालयाशी सीमित असून फौजदारी गुन्हा नोंद प्रकरणी संबंधित न्यायालयात योग्य तो निर्णय होईलच. सबब, उपरोक्त विवेचन विचारात घेऊन मी, नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये यलोगेट पोलिस ठाणे, मुंबई येथे गुन्हा नोंद क्र. ३९/२०११, दि.२१/०९/२०११ मध्ये जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालासंदर्भात न्यायालयीन निर्णयाच्या अधीन राहून खालील आदेश देत आहे.

<u>आदेश</u> :-

१) जप्त करण्यात आलेल्या अल हुसैनी बोटीमधील डिझेलचा संपुर्ण एकूण ३५ लिटर्स साठा, पारदर्शक ऑईलचा संपूर्ण एकूण ४००० लिटर साठा तसेच काळे तेलचा संपूर्ण एकूण २००० लिटर साठा शासनजमा करण्यात येत असून, सदर डिझेल, पारदर्शक ऑईल व काळे तेल या साठ्याची पोलीसांनी राज्य समन्वय तेल उद्योग, महाराष्ट्र राज्य, १०-पी, डि मेलो रोड, वाडीबंदर, मुंबई यांना देवून, त्यापोटी त्यांचेकडून प्राप्त होणारी रक्कम शासनजमा करावी.

२) जप्त करण्यात आलेली अल हुसैनी बोट ही शासनजमा करण्यात येत आहे. सदर बोटीच्या बाजारमुल्या एवढी रक्कम भरण्यास बोटीचे मालक तयार असल्यास, तेवढी रक्कम भरल्यानंतर सदरची बोट त्याच्या मालकास परत करण्यात यावी व सदर रक्कम शासनजमा करावी. तथापी, अशी कार्यवाही करण्यापूर्वी बोटीच्या मालकीबाबत पोलीसांनी खातरजमा करावी. अथवा बोट मालक सदरची रक्कम भरण्यास तयार नसल्यास या बोटीची जाहीर लिलावाने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी. तथापी, सदरची बोट लिलाव करण्यापूर्वी या कार्यालयास तसे लेखी सुचीत करावे.

३) घटनास्थळी जप्त करण्यात आलेले होंडा कंपनीचे पाच मोटार पंप, एक प्लॅस्टिकचे काळे कॅन इ. वस्तू शासनजमा करण्यात याव्यात. सदर वस्तूंची पोलिसांनी किरकोळीने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी.

वरीलप्रमाणे जप्त मुद्देमालाची पोलिसांनी विल्हेवाट लावून येणारी रक्कम पोलीसांनी वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई यांचे कार्यालयाच्या वैयक्तिक ठेव लेख्यात ४४०८ या लेखाशिर्षात जमा करावी.

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES
HEAD OFFICE
MUMBAI

प्रति;

१) मन्सूर अहमद इद्रिस देवळेकर, अल हुसैनी नावाच्या बोटीचे तांडेल
२) सलीम मोहम्मद अली खान, अल हुसैनी नावाच्या बोटीवरील खलाशी
३) राजू अमिद मंडल, अल हुसैनी नावाच्या बोटीवरील खलाशी
४) अमर सुरेंद्र पटनाईक, अल हुसैनी नावाच्या बोटीवरील खलाशी
५) अब्बास मुदक तरपदार, अल हुसैनी नावाच्या बोटीवरील खलाशी
६) अण्णाआपा सुब्रमण्यम स्वामी, अल हुसैनी नावाच्या बोटीवरील खलाशी
७) मुसा मुक्तार शेख, अल हुसैनी नावाच्या बोटीवरील खलाशी
८) राजू सोयलन विश्वास, अल हुसैनी नावाच्या बोटीवरील खलाशी
९) अल हुसैनी नावाच्या बोटीचे मालक
१०) हरिश जैस्वाल

(वरिष्ठ पोलीस निरीक्षक, यलोगेट पोलिस स्टेशन, मुंबई यांचे मार्फत)

प्रत,

१) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, यलोगेट पोलिस स्टेशन, मुंबई यांना कळविण्यात येते की, सदरचे आदेश संबंधीतांवर बजावून त्याची दिनांकित पोच या कार्यालयास तात्काळ सादर करावी. तसेच आदेशाची अंमलबजावणी करुन पूर्तता अहवाल विनाविलंब या कार्यालयास सादर करावा.
२) राज्य समन्वय तेल उद्योग, महाराष्ट्र राज्य, १०-पी, डि मेलो रोड, वाडीबंदर, मुंबई.
३) वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, बंगाली गर्ल्स हायस्कूल, चर्चगेट, मुंबई यांना माहितीसाठी अग्रेषित.
४) निवड नस्ती.

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.